# श्री गजानन महाराज बावन्नी

Gajanan Bavanni — Fifty-two Verses to Gajanan Maharaj

जय जय सद्गुरू गजानना ।
रक्षक तुची भक्तजना ॥१॥

निर्गुण तू परमात्मा तू ।
सगुण रूपात गजानन तू ॥२॥

सदेह तू परि विदेह तू ।
देह असूनि देहातीत तू ॥३॥

माघ वद्य सप्तमी दिनी ।
शेगांवात प्रगटोनी ॥४॥

उष्ट्या पत्रावळी निमित्त ।
विदेहत्व तव हो प्रगट ॥५॥

बंकटलालावरी तुझी ।
कृपा जाहली ती साची ॥६॥

गोसाव्याच्या नवसासाठी ।
गांजा घेसी लावुनी ओठी ॥७॥

तव पदतीर्थे वाचविला ।
जानराव तो भक्त भला ॥८॥

जानकीरामा चिंचवणे ।

नासवुनी स्वरूपी आणणे ॥९ ॥

मुकिन चंदुचे कानवले ।

खाऊनि कृतार्थ त्या केले ॥१० ॥

विहिरीमाजी जलविहिना ।

केले देवा जलभरणा ॥११ ॥

मधमाश्यांचे डंख तुवा ।

सहन सुखे केले देवा ॥१२ ॥

त्यांचे काटे योगबले ।

काढुनि सहजी दाखविले ॥१३ ॥

कुस्ती हरिशी खेळोनी ।

शक्ती दर्शन घडवोनी ॥१४ ॥

वेद म्हणुनी दाखविला ।

चकित द्रविड ब्राम्हण झाला ॥१५ ॥

जळत्या पर्यंकावरती ।

ब्रम्हगिरीला ये प्रचिती ॥१६ ॥

टाकळीकर हरिदासाचा ।

अश्व शांत केला साचा ॥१७ ॥

बाळकृष्ण बाळापूरचा ।

समर्थ भक्तचि जो होता ॥१८ ॥

रामदासरूपे त्याला ।

दर्शन देवुनि तोषविला ॥१९ ॥

सुकलालाची गोमाता ।

व्दाड बहू होती ताता ॥२० ॥

कृपा तुझी होतांच क्षणी ।

शांत जाहली ती जननी ॥२१ ॥

घुडे लक्ष्मण शेगांवी ।

येता व्याधी तूं निरवी ॥२२ ॥

दांभिकता परि ती त्याची ।

तू न चालवूनि घे साची ॥२३ ॥

भास्कर पाटील तव भक्त ।

उध्दरिलासी तू त्वरीत ॥२४ ॥

आज्ञा तव शिरसा वंद्य ।

काकंहि मानित तुज वंद्य ॥२५ ॥

विहिरीमाजी रक्षियला ।

देवां तु गणु जव-याला ॥२६ ॥

पितांबराकरवी लीला ।

वठला आंबा पल्लविला ॥२७ ॥

सुबुध्दी देशी जोशयाला ।

माफ करी तो दंडाला ॥२८ ॥

सवड्द येथील गंगाभारती ।

थुकुंनी वारिली रक्तपिती ॥२९ ॥

पुंडलिकांचे गंडांतर ।

निष्ठा जाणुनि केले दुर ॥३० ॥

ओंकारेश्वरी फुटली नौका ।

तारी नर्मदा क्षणात एका ॥३१ ॥

माधवनाथा समवेत ।

केले भोजन अुच्छिष्ट ॥३२ ॥

लोकमान्य त्या टिळकांना ।

प्रसाद तूंची पाठविला ॥३३ ॥

कवर सुताची कांदा भाकर ।

भक्षिलीस त्वा प्रेमाखातर ॥३४ ॥

नग्न बैसुनी गाडीत ।

लिला दाविली विपरीत ॥३५ ॥

बायदे चित्ती तव भक्ती ।

पुंडलिकावर विरक्त प्रीती ॥३६ ॥

बापुना मनी विठ्ठल भक्ती ।

स्वये होशि तू विठ्ठल मूर्ती ॥३७ ॥

कवठ्याचा त्या वारक-याला ।

मरीपासूनी वाचविला ॥३८ ॥

वासुदेव यति तुज भेटे ।

प्रेमाची ती खुण पटे ॥३९ ॥

उध्दट झाला हवालदार ।

भस्मिभूत झाले घरदार ॥४० ॥

देहांताच्या नंतरही ।

कितीजणा अनुभव येई ॥४१ ॥

पडत्या मजुरा झेलियले ।

बघती जन आश्चर्य भले ॥४२ ॥

अंगावरती खांब पडे ।

स्त्री वांचे आश्चर्य घडे ॥४३ ॥

गजाननाच्या अद्भत लीला ।

अनुभव येती आज मितीला ॥४४ ॥

शरण जाऊनी गजानना ।

दुःख तयाते करि कथाना ॥४५ ॥

कृपा करि तो भक्तांसी ।

धावुनी येते वेगेसी ॥४६ ॥

गजाननाची बावन्नी ।

नित्य असावी ध्यानीमनी ॥४७ ॥

बावन्न गुरूवारी नेमे ।

करा पाठ बहू भक्तीने ॥४८ ॥

विघ्ने सारी पळती दूर ।

सर्वसुखाचा येई पुर ॥४९॥

चिंता साऱ्या दुर करी ।

संकटातूनी पार करी ॥५०॥

सदाचार रत सद् भक्ता ।

फळ लाभे बघता बघता ॥५१॥

भक्त बोले जय बोला ।

गजाननाची जय बोला ॥५२॥